Happy Diwali

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०३ ● अंक : ०३७ ● पुणे ● रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### सहाय्यक आयुक्तांची उचलबांगडी

**पुणे (आरंभ पर्व) : शेवाळवाडी-मांजरी परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता, रस्त्यांवर पडलेले खड्डे, ड्रेनेज व्यवस्था, तसेच वाढलेली अतिक्रमणे अशा त्रुटी आढळल्याने महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी कठोर निर्णय घेतला आहे. हडपसर क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील यांची तडकाफडकी बदली करून त्यांच्या जागी कार्यकारी अभियंता रवी खंदारे यांची नियुक्ती करण्याचा आदेश आयुक्त आयुक्तांनी दिला. तसेच, शाखा अभियंता, आरोग्य निरीक्षक व मुकादम यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी शहराच्या स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केले आहे. वारंवार सूचना देऊनही त्याकडे दुर्लक्ष करून मनमानी कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना दणका देण्यास आयुक्तांनी सुरुवात केली आहे. आयुक्त राम यांनी शनिवारी सकाळी शेवाळवाडी-मांजरी परिसराचा दौरा करून तेथील सुविधांची पाहणी केली. यामध्ये अस्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था, रस्त्यांवरील खड्डे, अतिक्रमण, तसेच नाल्यांमधून वाहणाऱ्या सांडपाण्याच्या समस्येवर बोट ठेवून नाराजी व्यक्त केली.**

### मार्केट यार्डात पोलीस हवालदारावर हल्ला

**पुणे (आरंभ पर्व) : मार्केट यार्ड भागात पोलीस हवालदाराला ट्रकचालक आणि साथीदारांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी ट्रकचालकासह तिघांना अटक करण्यात आली. सुमीत सुभाष सरकटे (वय ३४, रा. खराडी, नगर रस्ता), अक्षय नानासाहेब शिंदे (वय ३०, रा. तळवडे, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) आणि मनजीत सुभाष कांबळे (वय २८, रा. घोरपडी गाव) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलीस हवालदार महेश सुभाष साळुंखे (वय ३९, रा. बिबवेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. हवालदार साळुंखे हे बंडगार्डन पोलीस ठाण्यात नियुक्तीस आहेत. ते गुरुवारी (१७ ऑक्टोबर) रात्री साडेदहाच्या सुमारास कामावरुन बिबवेवाडीतील घरी निघाले होते. मार्केट यार्डातील वखार महामंडळ चौक ते गंगाधाम चौक दरम्यान ट्रक भरधाव वेगात निघाला होता. गंभीर स्वरुपाचा अपघात घडण्याची शक्यता होती.**


# जाहिराती नाहीत तर बातम्या नाहीत

## पत्रकार संघटना आणि संपादकांचा इशारा

## पत्रकार, संपादक आणि वृत्तपत्र मालक एकत्र - 'बातमी बंद आंदोलन'चीही घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील वृत्तपत्रांवर पुन्हा एकदा आर्थिक संकटाचे काळे ढग दाटले आहेत. शासनाकडून तसेच खासगी क्षेत्राकडून वृत्तपत्रांना मिळणाऱ्या जाहिरातींमध्ये झालेल्या मोठ्या कपातीमुळे अनेक लघु आणि ग्रामीण माध्यम संस्थांचा गाडा अडखळू लागला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील पत्रकार संघटना, संपादक परिषद, आणि वृत्तपत्र मालक संघटनांनी एकत्र येत सरकारला थेट इशारा दिला आहे - "जाहिराती नाहीत तर बातम्या नाहीत!"



**जाहिरातींचे वाटप पक्षपाती, लघु वृत्तपत्रे संकटात :** गेल्या काही महिन्यांपासून शासकीय जाहिरातींचे वाटप अत्यंत असमान व निवडक माध्यमांनाच दिले जात असल्याचे संपादक व पत्रकार संघटनांकडून निदर्शनास आणले गेले आहे. ग्रामीण, तालुका व जिल्हास्तरावर कार्यरत असलेल्या लघु वृत्तपत्रांना तर जाहिरातींचा पुरवठा जवळपास थांबलेला आहे. यामुळे अनेक ठिकाणी वृत्तपत्रांच्या छपाईत अडथळे येऊ लागले असून पत्रकार, छायाचित्रकार, डिझायनर व वितरक या सर्वच घटकांच्या उपजीविकेवर परिणाम झाला आहे.

**'लोकशाहीचा चौथा स्तंभ' कोसळू देणार नाही - पत्रकार संघ**

या पार्श्वभूमीवर पत्रकार संघटनांनी पुण्यात एक संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, संपादक परिषद, मराठी वृत्तपत्र मालक संघ, तसेच जिल्हास्तरीय प्रतिनिधी सहभागी झाले होते.

बैठकीनंतर जारी केलेल्या निवेदनात संघटनांनी म्हटले आहे की - "पत्रकारिता ही केवळ माहिती देण्याचे माध्यम नाही, तर लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. सरकारने जाहिरातींच्या माध्यमातून माध्यमांना दाबण्याचा प्रयत्न केला, तर लोकशाही कमकुवत होईल. आम्ही स्पष्ट सांगतो - जाहिराती मिळाल्या नाहीत, तर बातम्या थांबतील!"

**ज्येष्ठ संपादकांचा इशारा : 'माध्यम दाबले तर लोकशाही कोसळेल'**

ज्येष्ठ संपादक गोविंद घोळवे, शरद पाटील आणि मृणाल देशमुख यांनी माध्यम परिषदेत सांगितले,

"सरकारकडून दिल्या जाणाऱ्या जाहिराती ही कोणती 'मदत' नसून लोकशाही टिकवण्याचे साधन आहे. बातम्या छापण्यासाठी, जनतेपर्यंत सत्य पोहोचवण्यासाठी माध्यमांना आर्थिक आधार आवश्यक आहे. माध्यमं जर अडचणीत आली, तर लोकशाहीचे संतुलनच बिघडेल."

पत्रकार संघटनेचे पदाधिकारी सांगतात - "सरकारने माध्यमांकडे दुर्लक्ष केले, तर जनता काय घडते आहे हेच जाणणार नाही. माहितीचे प्रवाह थांबले, तर लोकशाहीचा पाया हलतो. त्यामुळे आमचा संघर्ष केवळ जाहिरातींसाठी नाही, तर पत्रकारितेच्या अस्तित्वासाठी आहे."

दरम्यान, या सर्व घडामोडींवर राज्य माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. काही सूत्रांच्या माहितीनुसार, नवीन जाहिरात धोरण तयार करण्याबाबत विचार सुरू आहे. मात्र, पत्रकार संघटनांनी याला केवळ "विलंबाचे निमित्त" ठरवले असून त्यांनी स्पष्ट सांगितले - "वाट पाहण्याचा काळ संपला आहे; आता कृती हवी."

"जाहिराती नाहीत तर बातम्या नाहीत" हा केवळ इशारा नसून, माध्यमांची अस्तित्वाची लढाई आहे.

सरकार, समाज आणि वाचक या तिन्ही घटकांनी वेळेवर हस्तक्षेप केला नाही, तर उद्या देशात बातम्या थांबतील - आणि लोकशाहीचाही आवाज मंदावेल.

### मुख्य मागण्या

**संघटनांनी शासनाकडे खालील ठोस मागण्या मांडल्या आहेत :**

**१. पारदर्शक जाहिरात धोरण - जाहिरातींचे वितरण ठराविक निकषांवर आणि सर्व माध्यमांना समान संधी देऊन करावे.**

**२. ग्रामीण माध्यमांना न्याय - ग्रामीण आणि लघु वृत्तपत्रांना दरमहा निश्चित प्रमाणात जाहिराती मिळाव्यात.**

**३. माध्यमांच्या आकारानुसार वाटप - मोठ्या व लघु माध्यम संस्थांना त्यांच्या प्रसारानुसार जाहिरात बजेटमधून प्रमाणात वाटप व्हावे.**

**४. वृत्तपत्र उद्योगाला 'आवश्यक सेवा' दर्जा - कोविड काळात जसे वैद्यकीय सेवा आवश्यक ठरल्या, तसेच माहिती प्रसाराची जबाबदारीही आवश्यक सेवेत मोडावी.**

**५. आर्थिक साहाय्य योजना सुरू करावी - लघु वृत्तपत्रांसाठी स्वतंत्र 'मीडिया स्थैर्य निधी' उभारावा.**

### 'बातमी बंद आंदोलन'चा इशारा

**पत्रकार संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर शासनाने पुढील काही दिवसांत ठोस भूमिका घेतली नाही, तर राज्यभर "बातमी बंद आंदोलन" छेडले जाईल. या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात मुंबईत पत्रकार आणि संपादकांचा महामोर्चा काढण्यात येणार असून, त्यानंतर जिल्हा स्तरावरही निदर्शने होतील.**

# जातीय, धार्मिक तेढ देशासाठी घातक

## खासदार सुप्रिया सुळे; राज्यातील आर्थिक स्थिती बिकट

**वारजे (दै. आरंभ पर्व)**

"राजकीय फायद्यासाठी जाती-धर्मात तेढ निर्माण करणे, हे संविधानविरोधी असून, देश आणि भावी पिढ्यांसाठी घातक आहे," असे प्रतिपादन खासदार सुप्रिया सुळे यांनी केले. कर्वेनगर येथे माजी नगरसेविका लक्ष्मी दुधाणे, स्वप्नील दुधाणे यांच्या पुढाकाराने व महापालिकेतर्फे उभारण्यात येत असलेल्या धनुर्विद्या क्रीडासंकुलाचे भूमिपूजन सुळे यांच्या हस्ते झाले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, सचिन दोडके, महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.




सुळे म्हणाल्या की, विविधता हे भारताचे बलस्थान असून, समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांविरोधात एकजुटीने लढा देणे आवश्यक आहे. राज्यातील आर्थिक स्थिती बिकट असून, शिवभोजन थाळी आणि लाडकी बहीण योजना अडचणीत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील वाहतूक, पाणीपुरवठा आणि कचरा समस्यांकडे लक्ष द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. स्वप्नील दुधाणे यांनी संकुलासाठी झालेल्या चार वर्षांच्या प्रयत्नांचा आढावा मांडला, तर प्रशांत जगताप यांनी काम करणाऱ्यांना आगामी निवडणुकीत पाठिंबा देण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन शोभा कुलकर्णी यांनी केले. किशोर शेंडगे यांनी आभार मानले.

# सुरक्षारक्षकांना ना वेतन, ना बोनस! कर्मचारी हवालदिल

## पुणे महापालिकेला ठेकेदार देईना दाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेतील कर्मचाऱ्यांना हजारो रुपयांचा बोनस जमा झाला, कंत्राटी कामगारांनाही पगार वाढवून मिळाला, असे असताना परिमंडळ तीनमधील १६५ कंत्राटी सुरक्षारक्षकांना बोनस मिळाला नाही. त्यातील ६५ जणांना वेतनही मिळाले नाही. त्यामुळे कर्मचारी हवालदिल झाले आहेत. अधिकाऱ्यांनी ठेकेदाराला संपर्क केला, तरीही त्याने प्रतिसाद दिला नाही, अशी अवस्था झाल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होत नसल्याचे समोर आले आहे. महापालिकेची विविध कार्यालये, मालमत्ता, उद्याने, स्मशानभूमी, मैदाने, तसेच जलशुद्धीकरण केंद्रांवर खासगी सुरक्षारक्षक तैनात आहेत. त्यांना प्रत्येक महिन्याच्या सात तारखेला वेतन देणे बंधनकारक असून, आयुक्तांच्या नव्या आदेशानुसार सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी दहा हजार रुपये बोनस देण्याच्या सूचना दिल्या आहेत. सुरक्षासेवेसाठी महापालिकेने एकूण तीन ठेकेदार कंपन्यांशी करार केला आहे. त्यापैकी क्रिस्टल कंपनीकडे परिमंडळ तीनमधील वारजे-कर्वेनगर, सिंहगड रस्ता आणि धनकवडी-सहकारनगर या तीन क्षेत्रीय कार्यालयांचा समावेश आहे.




# नीलेश घायवळ : उद्योजिकेकडून ४४ लाख उकळले

## जीवे मारण्याची दिली धमकी, खंडणीचा धंदा उघड!

**नीलेश घायवळविरुद्ध आतापर्यंत सात गुन्हे : कोथरूड गोळीबार प्रकरणात पसार असलेल्या नीलेश घायवळवर आतापर्यंत सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. खंडणी, सदनिका बळकावल्या, अपहरण अशा प्रकारचे गुन्हे घायवळ आणि त्यासाथीदारांवर दाखल आहेत.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कर्वेनगर, शिवणे भागातील एका नामवंत शाळेतील विद्यार्थ्यांना खाद्यपदार्थ, तसेच वाहतूक सेवा पुरविणाऱ्या खासगी कंपनीतील संचालक महिलेला धमकावून नीलेश घायवळ, त्याचा भाऊ सचिन आणि साथीदारांनी ४४ लाखांची खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी घायवळसह १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संचालक महिलेने याबाबत वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



तिने दिलेल्या फिर्यादीनुसार बापू कदम, नीलेश घायवळ, सचिन घायवळ, पप्पू दळवी, अभी गोरडे, दीपक आमले, बाबू वीर, अमोल बंडगर, बाबू पिसाळ, अमोल लाखे, संदीप फाटक, बबलू गोळेकर, बबलू सुरवसे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.

गुन्हा दाखल करण्यात आलेल्यामधील कदम हा एका शाळेतील क्रीडा शिक्षक आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांची भागीदारीत एक कंपनी आहे. कंपनीकडून कर्वेनगर, शिवणे भागातील नामवंत शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नपदार्थ, तसेच वाहतूक सुविधा पुरविली जाते. व्यवसायातून त्यांची कर्वेनगर भागातील एका शाळेत क्रीडा शिक्षक म्हणून काम करणारा बापू कदम याच्याशी ओळख झाली होती. 'माझी कोथरूड भागात डेअरी आहे. शाळेतील उपाहारगृहात दूध आणि पनीर पुरवठा करण्याचे काम मला द्या. माझ्याकडून पनीर, दूध खरेदी करा', असे कदमने त्यांना सांगितले.

दरम्यान, कदम याचा गुन्हेगारी टोळीशी संबंध असल्याची माहिती महिलेला मिळाली होती. त्यानंतर कदमच्या खात्यात महिलेने २२ लाख दोन हजार रुपये वेळोवेळी पाठविले. मात्र, त्याने पनीर, दूध पुरवठा केला नाही. त्यामुळे महिलेने बाहेरून पनीर, दूध खरेदी करून शाळेतील उपाहारगृहाला पुरविले.

जानेवारी २०२५ मध्ये महिलेने कदमची भेट घेतली.' तेव्हा मी नीलेश घायवळ टोळीसाठी काम करत असून, घायवळचा भाऊ सचिन हा क्रीडा शिक्षक आहे. शाळेतील उपाहारगृहासाठी आमच्याकडून दूध, पनीर खरेदी करावे लागेल. अन्यथा तुमचा व्यवसाय बंद पाडू' अशी धमकी कदमने महिलेला दिली. त्यानंतर महिला मोटारीतून शाळेच्या परिसरातून निघाली होती. त्यावेळी कदमने मोटार अडविली. त्यावेळी दुसऱ्या मोटारीतून नीलेश घायवळ, त्याचा भाऊ सचिन आणि साथीदार उतरले.

घायवळचा भाऊ सचिन याने धमकावले. 'तुम्हाला जिवंत राहायचे नाही का ?', अशी धमकी देऊन लवकर खात्यात पैसे जमा करा, असे सांगितले. त्यानंतर महिलेने घाबरून पुन्हा २२ लाख रुपये बँक खात्यात जमा केले. त्यानंतर त्यांना कदम याची कोथरूडमध्ये डेअरी नसल्याची माहिती समजली. त्यामुळे महिलेने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली, असे फिर्यादीत नमूद आहे.



# डागाळलेली पोलीस यंत्रणा

हरयाणातील पोलीस यंत्रणा केवळ डागाळलेली नाही तर ती प्रचंड भ्रष्ट आहे आणि त्यात कित्येक पोलीस अधिकाऱ्यांचे बळी गेले आहेत. ७ ऑक्टोबरला वाय पूरन कुमार या हरयाणातील आयपीएस अधिकाऱ्याने खळबळजनक आत्महत्या केली आणि त्याला जातीय रंग देण्याचा प्रयत्न झाला. पण संदीप कुमार या दुसऱ्या एका अधिकाऱ्याने ज्याने वाय पूरन कुमार यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे काम सुरू केले होते त्यानेही आत्महत्या केली आहे आणि या प्रकरणात दिसते त्यापेक्षा कितीतरी जास्त खोलवर दडलेले आहे असे लक्षात येते आहे. पूरन कुमार यांच्या आत्महत्येनंतर ते दलित असल्यामुळे अनेकांना त्यांच्याबद्दल कढ आला. अर्थात त्यांनी आत्महत्या केली हे वाईटच झाले. तसे होऊ नये. पण पूरन कुमार हे काही बळीचा बकरा नव्हते तर त्यांनी प्रचंड भ्रष्टाचार केला आणि त्यामुळेच कुटुंबाची प्रतिष्ठा जाऊ नये म्हणून त्यांनी आत्महत्या केली, असे आता समोर आले आहे. पूरन कुमार यांची आत्महत्या काही जातीयवादातून उद्भवलेला प्रकार नव्हता तर भ्रष्टाचारातून झालेले हे हत्याकांड होते असे आता समोर आले आहे. हरयाणात भाजपचे सरकार आहे आणि ते आता बॅकफुटवर गेले आहे, पूरन कुमार यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत हरयाणाचे पोलीस महासंचालक शत्रुजीत कपूर यांच्यासह आठ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांवर जातीवर आधारित भेदभाव, छळ आणि सार्वजनिक अपमान केल्याचा आरोप केला आहे. आता या प्रकरणाची चौकशी होईल आणि खरे गुन्हेगार समोर येतीलही. पण भाजप सरकार मात्र अडचणीत आले आहे.

पूरन कुमारच्या पत्नी वरिष्ठ शासकीय अधिकारी असून त्या परराष्ट्र मंत्रालयात कार्यरत आहेत आणि पूरन कुमार जेव्हा मृतावस्थेत आढळले तेव्हा त्या परराष्ट्र विभागातर्फे जपानमध्ये गेल्या होत्या. दलित आणि एसटी कायद्याखाली आता एसआयटी स्थापन करण्यात आली आहे, दलित अधिकाऱ्याचा छळ केल्याचे हे प्रकरण असले तरीही यात संदीप कुमार यांच्या आत्महत्येने या प्रकरणाला




वेगळाच रंग दिला आहे. कुमार हे भ्रष्ट होते आणि संदीप कुमारनी हरयानातील एका शेतात स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली आहे. त्यावरून हे प्रकरण नुसते जातीयवादाचे नाही तर भयंकर अशा कटकारस्थानानी भरलेले आहे असे लक्षात येते. हरयाणातील आयपीएस अधिकारी पूरन कुमार यांच्या आत्महत्येनंतर आता सायबरसेलचे एएसआय संदीप कुमार यांनी आत्महत्या केली आणि या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. डॅमेज कंट्रोलचा भाग म्हणून हरयाणा सरकारने शत्रुजीत कपूर यांना प्रदीर्घ सुट्टीवर पाठवले आहे. पण इतक्यावरच हे प्रकरण थांबणार नाही तर या प्रकरणाला जबाबदार असलेल्या प्रत्येकाने आपल्या कामात कुचराई केली आहे, त्यामुळे हरयाणातील संपूर्ण पोलीस यंत्रणाच चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे.

हरयाणा राज्य हे एकूणच भ्रष्ट पोलीस आणि सरकारातील गैरकारभारामुळे बदनाम आहे. यापूर्वी तेथे अशोक खेमका या अधिकाऱ्याची तब्बल ५७ वेळा बदली झाली आणि त्याचे कारणही हे होते, की तो अधिकारी प्रामाणिक होता. पण तत्कालीन मुख्यमंत्री काँग्रेसचे भूपिंदर सिंह हुडा यांनी खेमका यांची बदली सातत्याने केली होती, या खेमका यांनी रॉबर्ट वडेरा यांचे ग्रुरुग्राम येथील जमीन प्रकरण रद्द करण्यात येऊ नये म्हणून दबाव आणण्यात आला. इतके भ्रष्ट प्रशासन आणि सरकारी यंत्रणा हरियाणात तेव्हा होती, पण आता तेथे पुष्कळच बदल झाला आहे. पूरन कुमार यांनी आत्महत्या केल्याचे प्रकरण हे भ्रष्टाचाराचे तर आहेच पण ते जातीयवादाचे आहे आणि यानंतर आणखी एका अधिकाऱ्याच्या आत्महत्येने हे प्रकरण वेगळ्याच प्रकाशात आले आहे. पण या एकूणच प्रकाराने भाजप सरकार मात्र संकटात सापडले आहे, कारण देशात दलितांना घेऊन चालणाऱ्या राजकारणाला धार आली आहे. विरोधी पक्ष घेराबंदी करत आहेत, तर विद्यार्थी संघटना पुढे आल्या आहेत. पूरन कुमार यांच्या आत्महत्येमुळे हरियाणातील संपूर्ण जनजीवन ढवळून निघाले आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही, विरोधी पक्षाचे म्हणणे असे आहे, की हे प्रकरण केवळ एका अधिकाऱ्याच्या आत्महत्येचे नाही तर न्याय, समानता आणि सामाजिक सन्मान आणि समानतेचे आहे. काँग्रेसच्या काळातही अनेक दलित अधिकाऱ्यांना हिंसाचार आणि तत्सम जातीयवादाशी संबंधित अत्याचारांना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे आता काँग्रेसने नाक वर करून दलितांच्या आत्महत्येबद्दल कळवळा आणणे चूक आहे.

पूरन कुमार यांच्या आत्महत्येचे वादळ शमत नाही तोच आणखी एका आत्महत्येने नव्या वादळाची सूचना दिली आहे. हरियाणात आणि पंजाबात सारे काही आलबेल नाही तर साराच गोंधळ आहे हे उघड आहे. या साऱ्या प्रकरणात पोलीस यंत्रणा भ्रष्ट, राज्यकर्ते सारेच आपल्यापलीकडे काही न पाहणारे आणि जनता वाऱ्यावर सोडलेली असे चित्र दिसते. त्याचा परिपाक म्हणजे या दोन आत्महत्या आहेत. यात दोष कुणाचा हे लवकरच समोर येईल. पण एकही हरियाणातील अधिकारी सुरक्षित नाही आणि त्यांच्यावर मृत्यूचे सावट घोंघावत आहे हे निश्चित. या साऱ्या प्रकरणाने भाजपची पंचाईत करून टाकली आहे हे निश्चित. कारण भाजपला हे चांगले माहीत आहे, की जितका या प्रकरणाला रंग चढेल तितका बिहार निवडणुकीत भाजपला फटका बसेल. बिहार असो की हरियाणा तेथे दलित मतांची टक्केवारी जास्त आहे. त्यामुळे बिहारमध्ये दलित मतांची टक्केवारी २०२३ च्या आकडेवारीनुसार १९. ६५ टक्के आहे. त्यांचा निवडणुकीवर परिणाम होणार नाही हे म्हणणे जरी योग्य नाही कारण प्रकरण हरयाणातील आहे. पण बिहारच्या दलितांच्या आत्महत्या प्रकरणाचे पडसाद बिहारमध्ये उमटणार हे नक्की. त्यामुळेच भाजप आज अवघड स्थितीत आहे, हरयाणात दलितांची मते २२ टक्के आणि सिरसा आणि अबाला या दोन्ही मतदारसंघात दोन्ही आरक्षित मतदारसंघात भाजपची हार झाली होती, त्यामुळे भाजप सावध झाला आहे आणि हरणायातील या प्रकरणाचा परिणाम बिहार निवडणुकीवर होऊ नये म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. पूरन कुमार यांच्या आत्महत्येने हरयाणा पेटलेले असतानाच संदीप लाठर यांच्या आत्महत्येने आणखी एका नव्या वादळाची त्सुनामी आणली आहे. त्यामुळे हे प्रकरण निश्चितच दोन अधिकाऱ्यांच्या आत्महत्यांपुरते संपणार नाही, तर कित्येक बळी घेऊन जाईल असे दिसते.

---

## महिलांच्या सशक्ततेचा नवा अध्याय उलगडणार - 'स्त्री Talks' चित्रपटाची पुण्यात घोषणा; तृप्ती देसाई मुख्य भूमिकेत

# आता बॉलीवूडमध्येही 'ताईगिरी'




### तृप्ती ताई देसाईंची प्रभावी मुख्य भूमिका

**भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती ताई देसाई या चित्रपटात मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. सामाजिक आंदोलनातून स्त्री हक्कांसाठी लढणाऱ्या तृप्ती ताईंची ही भूमिका महिलांच्या आत्मसन्मानाचा नवा अध्याय लिहिणारी ठरणार आहे. त्यांनी या प्रसंगी सांगितले, "हा चित्रपट केवळ मनोरंजनासाठी नाही, तर तो समाजातील महिलांच्या विचारांवर आणि त्यांच्या हक्कांवर संवाद घडवणारा आहे. मला खात्री आहे की 'स्त्री Talks' अनेकांना विचार करायला भाग पाडेल."**

- **चित्रपटाचे नाव: स्त्री Talks**
- **लेखन, दिग्दर्शन: आशिष कैलास जैन**
- **निर्माते: नवीन पवार**
- **कार्यकारी निर्माती: रोहिणी मानकर**
- **मुख्य भूमिका: तृप्ती ताई देसाई**
- **प्रदर्शन दिनांक: ८ मार्च २०२६**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिलांच्या भावविश्वावर, त्यांच्या संघर्षांवर आणि सशक्ततेवर भाष्य करणारा हिंदी चित्रपट 'स्त्री Talks' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची औपचारिक घोषणा आज पुण्यातील पत्रकार भवन, नवी पेठ येथे एका भव्य पत्रकार परिषदेत करण्यात आली.

या प्रसंगी चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक आशिष कैलास जैन, निर्माते नवीन पवार, कार्यकारी निर्माती रोहिणी मानकर तसेच प्रमुख भूमिकेत असलेल्या भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती ताई देसाई उपस्थित होत्या.

'स्त्री Talks' हा पूर्णपणे महिलांवर आधारित चित्रपट असून, विशेष म्हणजे यात एकही पुरुष पात्र नाही. या चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की वेगवेगळ्या विचारसरणीच्या, पार्श्वभूमीच्या आणि स्वभावाच्या ११ ते १२ महिला स्वतःला "डिटॉक्स" करण्यासाठी एका ठिकाणी एकत्र येतात. या प्रवासात त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या भावनिक, सामाजिक आणि मानसिक अनुभवांची गुंफण या चित्रपटात दाखवण्यात आली आहे.

दिग्दर्शक आशिष कैलास जैन यांच्या मते, "स्त्री Talks हा केवळ महिलांचा चित्रपट नसून, तो समाजाला आरसा दाखवणारा एक प्रयोग आहे. महिलांच्या वेदना, स्वप्नं आणि आत्मसन्मान यांचा खरा संवाद यातून घडतो."

चित्रपटात मासिक पाळी या विषयाला धर्म, देव आणि परंपरांशी विनाकारण जोडल्या जाणाऱ्या सामाजिक दृष्टिकोनावर ठोस आणि वास्तववादी भाष्य करण्यात आले आहे. तसेच drug addiction, स्त्री स्वातंत्र्य, अंतर्गत संघर्ष, आणि समाजातील दुहेरी मूल्यव्यवस्था या विषयांनाही धाडसीपणे हाताळले आहे.

चित्रपटाचे लेखन, कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन हे सर्व आशिष कैलास जैन यांनी केले आहे. त्यांनी सांगितले की, 'स्त्री Talks' हा चित्रपट महिलांना भावनिकदृष्ट्या सबळ करण्याचा आणि समाजातील रूढ चौकटींपलीकडे जाण्याचा प्रयत्न आहे.

हा चित्रपट हिंदी भाषेत असून येत्या ८ मार्च २०२६ – आंतरराष्ट्रीय महिला दिनी संपूर्ण देशभर प्रदर्शित होणार आहे.

स्त्री Talks टीमच्या मते, हा चित्रपट फक्त एक सिनेमॅटिक अनुभव नाही, तर एक विचारप्रवर्तक आंदोलन आहे - जिथे प्रत्येक स्त्री स्वतःच्या कथा निर्भयपणे सांगते आणि ऐकवते.

---

## थोडक्यात पण महत्वाचे




### स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड; बापू पोकळे यांचा आदर्श उपक्रम

**धायरी (आरंभ पर्व) : धायरी, नऱ्हे, वडगाव परिसरातील रस्ते स्वच्छ ठेवणाऱ्या 150 महिला सफाई कर्मचाऱ्यांसाठी दिवाळी खास बनवणारा सुंदर उपक्रम पार पडला. शहर स्वच्छतेसाठी रोज मेहनत करणाऱ्या या बहिणींना सन्मान देण्यासाठी खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब बाबासाहेब पोकळे (पाटील) आणि सौ. प्रितीताई पोकळे (पाटील) यांनी दिवाळी सरंजाम वाटप सोहळ्याचे आयोजन केले. खडकवासल्याचे आमदार भीमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेचे सहकेंद्रिय मंत्री दादाजी वेदक, माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, भाग सरसंघचालक सचिनजी नागपुरे, मंडळ अध्यक्ष यशवंत लायगुडे, शिव वंदना मित्रपरिवार अध्यक्ष प्राजजी भिलारे आणि पैलवान तुषार पोकळे यांची उपस्थिती लाभली. सरंजाम घेताना अनेक महिला कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दिसले. हा उपक्रम फक्त वाटप नव्हता, तर त्यांच्या कष्टाची दखल घेणारा आणि मनाला स्पर्श करणारा सन्मान होता. समाजासाठी निःस्वार्थ सेवा करणाऱ्या या स्वच्छता वीरांगनांना दिलेला हा आदर खऱ्या अर्थाने दिवाळीचा आनंद वाढवणारा ठरला.**



### सारथी ट्रस्टतर्फे अनाथ मुलींसाठी दिवाळी स्नेहसंमेलन

**पुणे (आरंभ पर्व) : सारथी रुग्णहक्क जनसेवा ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष श्री. दीपक चौघुले यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ मुलींसाठी दिवाळी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात जवळपास 170 मुलींना स्नेहभोजन तसेच विविध साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजातील वंचित मुलींनाही सणाचा आनंद मिळावा, हा या उपक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डीसीपी गणेश इंगळे, एसीपी राहुल आवारे, डॉ. सुनिता ललवाणी, नाथा भुजबळ, डॉ. सिद्धांत ललवाणी आणि डॉ. महिमा ललवाणी उपस्थित होते. डीसीपी इंगळे यांनी चौघुले यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करताना "ते दरवर्षी हजारो विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देतात तसेच गरीब रुग्णांना कमी खर्चात उपचार मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात" असे सांगितले. डॉ. सुनिता ललवाणी यांनी शिस्त आणि सकारात्मकतेचे महत्त्व अधोरेखित केले, तर एसीपी आवारे यांनी "स्वतःला कधीही अनाथ समजू नका, जिद्द आणि प्रयत्नाने सर्व काही शक्य आहे" असा संदेश दिला. या उपक्रमात हरिभाऊ दळवी, अनिल चौघुले, दीपराज सावंत, सागर कारंडे कुलदीप नाईकनवरे, पद्मजा गव्हाणे आणि अनिता चौघुले यांचेही मोलाचे योगदान राहिले. कार्यक्रम आनंदात पार पडला. समाजसेवेसाठी दीपक चौघुले आणि त्यांच्या टीमचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.**

### सुशील भायजे धामापूर तर्फे संगमेश्वर जिल्हा परिषद गटातून लढणार

**संगमेश्वर (आरंभ पर्व) : संगमेश्वर तालुक्यातील धामापूर तर्फे संगमेश्वर (४०) जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस चे धामापूर गावचे सुपुत्र सुशील भायजे इच्छुक आहेत.या जिल्हा परिषद गटातून सुशील भायजे निवडणूक लढवणार असल्याचे जवळ जवळ निश्चित झाले आहे. सुशील भायजे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा युवक कार्याध्यक्ष आहेत.तर संगमेश्वर चिपळूण मतदार संघाचे आमदार शेखर निकम यांचे खंदे कार्यकर्ते व निकटवर्तीय समजले जातात.गतवर्षी झालेल्या आमदारकीच्या निवडणुकीत धामापूर तर्फे संगमेश्वर जिल्हा परिषद गटाने आम शेखर निकम यांना निर्णायक लीड दिल्याने विजय सुकर झाला होता. हे.मताधिक्य मिळवून देण्यात सुशील भायजे यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.**

---




### कराडी टेल्सकडून 'टेन डेज टू दिवाळी' पुस्तकाचे पुण्यात जल्लोषात प्रकाशन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य बालसाहित्य प्रकाशक कराडी टेल्स यांनी आपल्या नव्या चित्रपुस्तकाच्या माध्यमातून पुण्यात सणासुदीचा आनंद पसरवला. "टेन डेज टू दिवाळी" या पुस्तकाचे प्रकाशन रीडअबू लायब्ररी आणि कहानी किड्स लायब्ररी येथे रंगतदार पद्धतीने पार पडले. या वेळी लहान वाचक, पालक आणि शिक्षकांनी उत्साहात सहभागी होत मजेदार वाचन आणि कृती सत्रांचा आनंद घेतला. भारती सिंग लिखित आणि अंबिका करंदीकर यांनी चित्रित केलेले "टेन डेज टू दिवाळी" हे पुस्तक दिवाळीपूर्वी घराघरात सुरू होणाऱ्या साफसफाई, तयारी आणि गडबडीतील आनंददायक आणि विनोदी प्रसंगांवर आधारित आहे. कराडी टेल्सच्या पब्लिशिंग डायरेक्टर शोभा विश्वनाथ म्हणाल्या, "ही कथा दिवाळीपूर्वी घरात होणाऱ्या तयारीचा सार्वत्रिक अनुभव सुंदररीत्या मांडते. या सगळ्या सणाच्या गडबडीतून मुलांना नियोजन आणि कामाचे व्यवस्थापन या गोष्टी हलक्या-फुलक्या पद्धतीने शिकवते - आणि हे प्रत्येक कुटुंबाला भावेल असं आहे." या कार्यक्रमाला निधी ठप्पर, काजल छतिजा, वृषाली बर्बरे आणि सोनल बेहर यांसारख्या नामांकित शिक्षिका उपस्थित होत्या. त्यांनी या पुस्तकाच्या कथनशैलीचे, सांस्कृतिक संदर्भांचे आणि विनोदात्मक मांडणीचे कौतुक करत हे पुस्तक मुलं आणि पालक दोघांनाही भावेल असे मत व्यक्त केले.

## जनतेच्या मूलभूत हक्कांसाठी भूपेंद्र मोरे यांची लढाई!

### नाल्यावरील अतिक्रमण व नवीन पाईपलाईनची केली मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे – धायरी – वडगाव परिसरातील नागरिकांना दररोज पाणीटंचाई, अतिक्रमण आणि सुरक्षिततेच्या समस्यांचा सामना करावा लागतो. या गंभीर प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी खडकवासला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्याध्यक्ष श्री. भूपेंद्र मोरे यांनी पुढाकार घेत नागरिकांच्या जीवनाशी निगडित दोन महत्त्वाच्या मागण्या लेखी स्वरूपात सादर केल्या.

आज महानगरपालिका कार्यालयात महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मीटिंग पार पडली.

त्यावेळी श्री. भूपेंद्र मोरे यांनी नऱ्हे धायरी परिसरातील दोन विषय मांडले.

पाणीपुरवठ्यासाठी नवीन लाईन व नाल्यावर झालेली



अतिक्रमणे काढण्यात यावी अशी त्यांची मागणी होती.

नागरिकांना पाण्याच्या तुटवड्याचा सामना करावा लागू नये यासाठी पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता श्री. नंदकिशोर जगताप यांच्याकडे नवीन पाईपलाईन टाकण्याची मागणी करण्यात आली.

पावसाळ्यात नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या नाल्यावर झालेल्या अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी महापालिकेचे आयुक्त श्री. नवल किशोर राम यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना यासंबंधी जाब विचारला. तात्काळ ठोस उपाय योजना करावी अशी मागणी चाकणकर यांनी केली.

"ही केवळ सुविधा मिळवण्याची नाही, तर जनतेच्या सन्मान आणि सुरक्षिततेची लढाई आहे, आचारसंहितेच्या अगोदर लवकरात लवकर हे विषय मार्गी लावा" असे भूपेंद्र मोरे म्हणाले.

त्यांच्या पुढाकारामुळे हजारो नागरिकांसाठी आशेचा किरण निर्माण झाला आहे आणि परिसरातील विकासाच्या दिशेने हा मोठा टप्पा ठरणार आहे. यावेळी विविध विभागाचे अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

---

# चार हजार महिलांना दिवाळी सरंजाम वाटप

### कोल्हेवाडीत दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवाराचा प्रेमळ उपक्रम

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

कोल्हेवाडी येथे समाजासाठी आपुलकीने काम करणारा दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवार यंदाही दिवाळीच्या सणात लोकांच्या आनंदाचा भाग ठरला. महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे आणि त्यांच्या पत्नी धनश्रीताई कोल्हे यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून चार हजार महिला भगिनींना दिवाळी सरंजाम वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला कोल्हेवाडी, खडकवासला, नांदेड, जेपीनगर किरकटवाडीतील महिला भगिनींनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवला. महिलांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता, तर अनेक घरांत सणाचा उजेड आणि गोडी पसरली.

कार्यक्रमाला शहर भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष दुष्यंत मोहोळ, पुणे शहर भाजपा उपाध्यक्ष सचिन मोरे , माजी सरपंच सुभाष नाणेकर, किशोर पोकळे, संदीप पोकळे, मा भाजप महिला मोर्चा अध्यक्ष रश्मी घुले पाटील, अजय कोल्हे, अश्विनी पालवे,प्रकाश गोरे,अजय मते, महेश हगवणे,

हेमेंद्र जोशी,लक्ष्मण तांदळे, प्रदीप हगवणे, शेखर हगवणे, सचिन लांगोरे, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाचे मार्गदर्शन आमदार भीमराव तापकीर यांनी केले.

"लोकांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमचं खरं समाधान आहे," असे भावनिक शब्द दत्ताभाऊ कोल्हे यांनी व्यक्त केले.

दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवाराच्या या उपक्रमामुळे कोल्हेवाडी आणि परिसरातील हजारो घरांत दिवाळीचा उत्साह अधिक उजळला. समाजासाठी मनापासून केलेली ही सेवा लोकांच्या आयुष्यात आनंद आणि आशेचा प्रकाश घेऊन आली आहे.



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५









# एमआयटी एडीटी विद्यापीठात मानसिक आरोग्य दिन साजरा

## सेंट तेरेसा स्कूलमध्ये विद्यार्थ्यांकडून पथनाट्य सादर



**लोणी-काळभोर (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च येथील विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य दिनानिमित्त सेंट तेरेसा स्कूल, लोणी-काळभोर येथे "मानसिक आरोग्याची संवेदनशीलता" या विषयावर आधारित पथनाट्य सादर केले.

शालेय विद्यार्थ्यांना भेडसावणारा मानसिक ताण, पालकांच्या अपेक्षा, अभ्यासाचा अतिरिक्त तणाव आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांवरील उपाय तसेच त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी पालक व शिक्षक यांची भूमिका या विषयांवर या पथनाट्यातून महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवणे, मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी उपयुक्त ठरणारे व्यायाम व प्राणायाम आदींची माहितीही या सादरीकरणातून देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे उपस्थित चिमुकल्यांमध्येही प्रचंड उत्सुकता निर्माण झाली.

सेंट तेरेसा स्कूलचे मुख्याध्यापक विनय सुकुल आणि उपमुख्याध्यापिका सॅलविना सुकुल यांचे या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष सहकार्य लाभले. तसेच शाळेचा शिक्षकवर्ग, विद्यार्थी आणि स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्चचे सर्व प्राध्यापक व छात्र-अध्यापक यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती डॉ. मंगेश कराड आणि कुलगुरू डॉ. राजेश एस. यांच्या प्रेरणेने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. महेश चोपडे आणि अधिष्ठाता डॉ. प्रिया सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. डॉ. नीता म्हवाण यांनी कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून काम पाहिले.




## अझीम प्रेमजी विद्यापीठात २०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या बेंगळुरू आणि भोपाळ येथील कॅम्पसमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६ साठी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. न्याय्य, समतामूलक, मानवतावादी आणि शाश्वत समाज घडविण्याच्या ध्येयाने स्थापन झालेल्या या विद्यापीठात शैक्षणिक काटेकोरपणा, वास्तव अनुभव आणि सामाजिक बांधिलकी यांचा समन्वय साधणारे अभ्यासक्रम राबविले जातात. विद्यापीठाचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना एक वेगळी आणि समृद्ध शैक्षणिक अनुभूती देण्यासाठी रचलेले आहेत. येथे विद्यार्थ्यांना विचार करणे, सहकार्य करणे आणि आपले शिक्षण प्रत्यक्ष

Azim Premji University

समस्यांवर लागू करण्यास प्रोत्साहन दिले जाते. कठोर शैक्षणिक पद्धती आणि व्यापक संशोधन संधींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मानवशास्त्र, विज्ञान, शिक्षण, विकास, आरोग्य आणि शाश्वतता या विविध विषयांत सखोल पाया मिळतो. या विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष क्षेत्रात समुदाय आणि संस्थांसोबत कार्य करण्याचा अनुभव. यामुळे विद्यार्थ्यांना सिद्धांत आणि प्रत्यक्ष व्यवहार यांचा संगम साधता येतो आणि अर्थपूर्ण करिअरसाठी तयारी करता येते.

## सहकारी बोर्डाच्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत साक्षी शिवेकर प्रथम



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

**किरण खुडे**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त महाराष्ट्र राज्य सहकारी संघ व पुणे जिल्हा सहकारी बोर्ड यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये प्रथम क्रमांक साक्षी शिवेकर (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय) हिने पटकावला. रोख १५००/-, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन तिचा गौरव करण्यात आला. तर द्वितीय क्रमांक दिव्या पिंगळे हिचा आला. तिला रोख १०००/-, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धेत विविध महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सहकार प्रशिक्षण केंद्राचे निवृत्त प्राचार्य प्रकाश पवार, खरेदी विक्री संघाचे संचालक दत्तात्रेय सातपुते, जिल्हा सहकारी विकास अधिकारी अशोक केदारी, विलास लिंबळे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. दिलीप मुळूक उपस्थित होते.

यावेळी बोलताना अशोक केदारी म्हणाले की, वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सहकार चळवळीविषयी जाणीव-जागृती व्हावी या उद्देशाने या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम आलेल्या साक्षी शिवेकर हिला महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या वतीने पुढील महिन्यात पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत थेट प्रवेश मिळणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन करण्यात महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संचालक हिरामण सातकर आणि स्व.आप्पासाहेब सातकर प्रतिष्ठाने सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार विलास लिंबळे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### "लोकसहभागाविना विधायक कार्य अशक्य" श्रीपाद नाईक :

**पणजी (आरंभ पर्व) : "समाजाच्या भल्यासाठी, आपण समाजाचे देणे लागतो, हा विचार समोर ठेवून विधायक कार्याच्या आधारे आपण कार्यरत राहायला हवे. देशात विधायक कार्यासाठी केवळ राजकीय पक्षच नव्हे, तर सर्वसामान्य जनतेनेही सहभाग घ्यायला हवा, तरच विधायक कार्य समाजाचा विकास शक्य आहे. लोकसहभाग असल्याशिवाय सामाजिक प्रगती किंवा विकास हा अशक्य असतो", असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या नव तथा अक्षय ऊर्जा मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री तथा उत्तर गोवा खासदार श्रीपाद नाईक यांनी काढले. पुणे येथून कार्यरत असलेल्या 'विश्वशांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, भारत'तर्फे इन्स्टिट्युट मिनेझीस ब्रागांझाच्या संयुक्त विद्यमाने पणजी येथील आय.एम.बी. सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या हृद्य कार्यक्रमात विश्वशांती पुरस्कार प्रदान करून देशभरातील दहा मान्यवरांचा सत्कार झाला. सत्कारमूर्तीमध्ये गोव्यातील पाच जणांचा समावेश होता. यावेळी गोमंतकीय साहित्यिकांच्या लेखनावरील तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. कविसंमेलनात गोव्यातील प्रतिभावंत कवींचा चांगल्यापैकी प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाला सहकारमंत्री सुभाष शिरोडकर यांचीही उपस्थिती लाभली होती.**




### ऑटर कंट्रोल्स इंडियाच्या ४५ लाख डॉलर्सच्या उत्पादन सुविधेचे अनावरण

**पुणे (आरंभ पर्व) : यूकेमधील ऑटर कंट्रोल्स लिमिटेडसोबतचा संयुक्त उपक्रम असलेल्या ऑटर कंट्रोल्स इंडियाने आज चाकण-पुणे भागातील आपल्या चौथ्या अत्याधुनिक उत्पादन सुविधेचे उद्घाटन केले. या नवीन उत्पादन सुविधेतून कंपनीच्या भारतातील उत्पादनासाठी लक्षणीय कटिबद्धतेचे प्रदर्शन होत असून यामध्ये एकूण ४५ लाख डॉलर्सची गुंतवणूक करण्यात आली आहे. ब्रिटिश ट्रेड ऑफिस-पुणे येथील व्यवसाय आणि व्यापार विभागासाठी फ्युचर मोबिलिटी डिपार्टमेंटचे प्रमुख श्री. अवनीश मल्होत्रा यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. या नवीन सुविधेमुळे कंपनी तिच्या कामकाजात लक्षणीय वाढ करण्यासाठी सज्ज असून त्यामुळे तिची एकूण उत्पादन क्षमता ७५ टक्क्याने वाढेल आणि चाकण-पुणे औद्योगिक केंद्रात १००० नवीन नोकऱ्या निर्माण होतील.**

## एमआयटी-एडीटी विद्यापीठ – सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात सामंजस्य करार




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे आणि कॉलेज ऑफ इंजिनियरिंग (सीओईपी) तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे' यांच्यात शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रकल्प, इंटर्नशिप तसेच भविष्यातील नवीन प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळणार आहे. या करारामुळे विद्यार्थी, प्राध्यापक तसेच दोन्ही संस्थांमधील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होणार आहेत. एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलपती तथा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनिता कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या प्रसंगी एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रा. डॉ. विरेंद्र शेटे (संचालक – एनईपी, रँकिंग व मान्यता), कुलसचिव डॉ. महेश चोपडे, आणि परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. ज्ञानदेव निलवर्ण उपस्थित होते. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाकडून कुलगुरू प्रा. डॉ. एस. बी. भिरूड, कुलसचिव डॉ. डी. एन. सोनवणे आणि प्रा. डॉ. विभा व्यास (विभागप्रमुख – इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन विभाग) यांच्या उपस्थितीत हा करार पार पडला.

या कराराचा उद्देश शैक्षणिक देवाणघेवाण, संयुक्त संशोधन प्रकल्प, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच ज्ञानविनिमयाच्या माध्यमातून दोन्ही प्रतिष्ठित संस्थांमधील सहकार्य वृद्धिंगत करणे हा आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विविध शाखांतील विद्यार्थ्यांची देवाणघेवाण, संसाधन वाटप आणि दोन्ही संस्थांच्या समन्वयातून संशोधनास चालना मिळून विद्यार्थी व संशोधकांना आंतरविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांमध्ये अधिक संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.




# महापालिका निवडणुकीसाठीची अंतिम मतदारयादी होणार जाहीर !



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य निवडणूक आयोगाने पुण्यासह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदारयादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मतदारयादीत नव्याने कोणाचेही नाव समाविष्ट होणार नसले, तरी दुबार नावे, मृत मतदारांची नोंद वगळण्याबरोबरच यादीतील चुका टाळण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत. निवडणुकीची अंतिम मतदारयादी महापालिका प्रशासनाला २८ नोव्हेंबरला प्रसिद्ध करावी लागणार आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक साडेतीन-चार वर्षांपासून रखडलेली आहे. महापालिकेच्या सभागृहाची मुदत संपल्याने संपूर्ण कारभार लोकप्रतिनिधींऐवजी प्रशासनाच्या हाती आला आहे. निवडणूक घेण्याची मागणी केली जात होती; तरी निर्णय होत नव्हता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक तातडीने घेण्याचा आदेश दिल्याने ही रखडलेली निवडणूक घेण्याची तयारी राज्य निवडणूक आयोगाने वेगाने सुरू केली आहे.

आयोगाने केलेल्या सूचनांनुसार, महापालिका आयुक्तांनी आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी स्थानिक वृत्तपत्र, महापालिका व प्रभाग समिती कार्यालयांचे सूचनाफलक, महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करायची आहे. तसेच, जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या मतदारयादीचा वापर न करता निवडणूक आयोगाने दिलेली मतदारयादी वापरावी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. महापालिका निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ ची विधानसभानिहाय मतदारयादी ग्राह्य धरली जाणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

या मतदारयादीमध्ये नव्याने नावे नोंदली जाणार नाहीत. केवळ तांत्रिक चुका दुरुस्त करून ती अंतिम केली जाणार आहे. आयोगाने मतदारयादी महापालिका प्रशासनाला पाठविली आहे. तिचे प्रभागनिहाय विभाजन करून प्रारूप मतदारयादी तयार केली जाणार आहे. प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी ६ नोव्हेंबर हा शेवटचा दिवस असणार आहे.

महापालिका प्रशासनाला २८ नोव्हेंबरला अंतिम मतदारयादी आणि ४ डिसेंबरला मतदान केंद्रांची यादी जाहीर करावी लागणार आहे. तर, १० डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदारयादी प्रकाशित करण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिला आहे. पुणे महापालिकेसह सर्व महापालिकांना मतदारयादी तयार करताना दुबार नावे, मृत व स्थलांतरित मतदारांची नोंद वगळण्याच्या, तसेच यादीतील चुका टाळण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत.या कार्यक्रमामुळे पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक तयारीची औपचारिक प्रक्रिया सुरू झाली असून, डिसेंबरअखेरपर्यंत ती पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### नावे नसल्यास हरकत नोंदविता येणार

**महापालिका आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निवडणूक आयोगाची यादी प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर नागरिकांना हरकती नोंदविता येणार आहेत. या हरकतींनुसार केवळ लेखनिकांच्या चुका, दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून वेगळ्या प्रभागात गेले असतील, विधानसभा मतदारसंघाच्या यादीत नावे असूनही महापालिकेच्या संबंधित प्रभागाच्या यादीतून नावे गायब झाली असल्यास ती प्रभागाच्या यादीत समाविष्ट करता येणार आहेत.**

### हरकती-सूचनांवर योग्य सुधारणा

**मतदारयादीत मृत व्यक्तींची नावे आढळल्यास किंवा त्याबाबत हरकती प्राप्त झाल्यास त्याची नोंद मार्क कॉपीमध्ये करण्यात येणार आहे. या मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर आयुक्तांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने निर्णय घेऊन योग्य त्या सुधारणा मतदारयादीत करायच्या आहेत, असे निवडणूक विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.**

## थोडक्यात पण महत्वाचे



## विद्यार्थ्याच्या बुद्धीला चालना बाल साहित्यातून मिळते : आ. बाबाजी काळे

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : शालेय विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देऊन त्यांचे जीवन सफल करण्यासाठी बालसाहित्याचा संच निश्चित उपयोगी पडेल. असा विश्वास खेड आळंदी विधानसभेचे आमदार बाबाजी काळे यांनी व्यक्त केला. राजगुरुनगर येथील सार्वजनिक वाचनालयात डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम, वाचनालयाने खरेदी केलेल्या नविन पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन व खेड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार शाळांना बालसाहित्य संचाचे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद गानू, सचिव राजेंद्र सुतार उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार काळे म्हणाले, अभ्यासक्रमात नसलेले ज्ञान पुस्तक वाचनाच्या छंदातून विद्यार्थ्यांनी आत्मसात करून वाचनाचा संस्कार शालेय जीवनापासून करावा. तसेच पुस्तकसंच विद्यार्थ्यांचे जीवन सफल करण्यास मार्गदर्शक ठरेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना बालसाहित्य संच वाटपाचा आगळा वेगळा उपक्रम अनुकरणीय आहे. ग्रामीण भागातल्या जनतेला हे वाचनालय वाचन संस्काराचे प्रेरक कार्य प्रभावीपणे करत असल्याचे कौतुक वाटते.

## चोरी होऊ नये म्हणून घ्या काळजी



उरुळी कांचन (आरंभ पर्व) : घर कुलूप बंद करून बाहेरगावी जाताना शेजारी तसेच पहारेकरी यांना घरावर लक्ष ठेवण्याबाबत कळवावे. घराच्या दरवाजा उच्च प्रतीचे कुलूप व कडी कोयंडा लावावे. बाहेरून दिसणारे घरातील लाईट चालू स्थितीत ठेवावे. शक्य असल्यास आपल्या घरच्या अवतीभवती चांगल्या प्रतीचे नाईट व्हिजन सी.सी.टी.व्हि. कॅमेरे लावावे. आपल्या गल्लीत काहीतरी विक्री करण्याच्या उद्देशाने अनोखी इसम आल्यास त्या व्यक्तीची सखोल चौकशी करावी. शक्य झाल्यास आपल्या मोबाईल मध्ये त्या इसमाचा फोटो काढून घ्यावा. शक्य झाल्यास घरातील सोन्या चांदीचे दागिने किंवा घरातील मैल्यवान वस्तू व रोख रक्कम घरातील कपाटात न ठेवता बँकेमध्ये, लॉकरमध्ये ठेवावे. कारण चोरट्यांचे घरातील कपाट हे पहिले टार्गेट असते. आपल्या घरच्या आजूबाजूच्या परिसरातील लाईट रात्रीच्या वेळी चालू स्थितीत राहतील याबाबत प्रयत्न करावे. चोरी केल्यानंतर लवकरात लवकर गावाबाहेर पडता यावे या दृष्टीने गावातील किंवा शहराच्या कडेला असणाऱ्या घरमालकाची जास्त घरे ही चोरट्यांचे टार्गेट वर असतात. त्यामुळे गावाच्या किंवा शहराच्या कडेला असणाऱ्या घरमालकानी शक्य तो काळजी घ्यावी.







# पुण्यात स्वच्छ ऊर्जेच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी उद्योग नेते एकत्र

## 'द बॅटरी शो इंडिया २०२५'ची तिसरी आवृत्ती ३० ऑक्टोबरपासून ग्रेटर नोएडा येथे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशातील आघाडीचे प्रदर्शन आयोजक 'इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडिया' ३० ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२५ दरम्यान इंडिया एक्स्पो सेंटर अँड मार्ट, ग्रेटर नोएडा येथे 'द बॅटरी शो इंडिया (टीबीएसआय) २०२५' चे तिसरे संस्करण 'रिन्यूएबल एनर्जी इंडिया (आरईआय)' सोबत आयोजित करण्यात येणार आहे.

मुख्य कार्यक्रमापूर्वी, १५ ऑक्टोबर रोजी जेडब्ल्यू मॅरियट, येथे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात ऊर्जा साठवण आणि इलेक्ट्रिक गतिशीलतेच्या इकोसिस्टममधील प्रमुख भागधारक या क्षेत्राच्या वाढीचा मार्ग, तांत्रिक प्रगती आणि उदयोन्मुख संधींवर विचारमंथन करण्यासाठी एकत्र आले. या परिषदेत भारतातील स्वच्छ ऊर्जा संक्रमणास चालना देणारे प्रतिष्ठित उद्योग नेत्यांनी भाग घेतला, ज्यात श्री. कपिल वैद्य, उपाध्यक्ष, एनर्जी इन मोशन; श्री. त्रिविक्रम आपटे, विक्री प्रमुख, अँडॉर डिगट्रॉन प्रा. लि.; फ्रॉस्ट अँड सुलिव्हनचे इलेक्ट्रिक व्हेइकल्स रिसर्चचे प्रमुख, श्री. प्रज्योत साठे; श्रीमती अपूर्वा बेडेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, कॉर्डवुड टेक्नॉलॉजीज एलएलपी; आणि




श्री. रमनिक सिंग, कंट्री हेड, इंडिया, गॅमा सीई टेक्नॉलॉजीज प्रा. लि. आणि श्री. रजनीश खट्टर, सीनियर ग्रुप डायरेक्टर, इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडिया यांचा समावेश होता.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि अवजड उद्योग मंत्रालयाच्या पाठिंब्याने होणारे 'द बॅटरी शो इंडिया' हे प्रदर्शन, भारतातील बॅटरी आणि ऊर्जा साठवणुकीसाठीचे सर्वात मोठे समर्पित व्यासपीठ असेल. यात जपान, अमेरिका, कोरिया आणि चीनसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील ३५० हून अधिक प्रदर्शक आणि ४०० ब्रँड्स सेल उत्पादन, सामग्री प्रक्रिया आणि ऊर्जा साठवण प्रणालीमधील अत्याधुनिक प्रगती दर्शवतील. २०,००० हून अधिक व्यापारी अभ्यागत आणि १०० हून अधिक उच्च-प्रोफाइल स्पीकर्सच्या अपेक्षित उपस्थितीसह, हा कार्यक्रम संपूर्ण ईव्ही आणि ऊर्जा साठवण मूल्य शृंखलेमध्ये तंत्रज्ञान हस्तांतरण आणि गुंतवणुकीसाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून काम करेल.

यावेळी बोलताना, श्री. रजनीश खट्टर, सीनियर ग्रुप डायरेक्टर, इन्फॉर्मा मार्केट्स इन इंडिया म्हणाले, " इलेक्ट्रिक वाहनांचा झपाट्याने स्वीकार, नवीकरणीय ऊर्जेचे एकत्रीकरण आणि बॅटरी तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे भारतातील बॅटरी आणि ऊर्जा साठवण इकोसिस्टममध्ये वेगाने वाढ होत आहे. 'द बॅटरी शो इंडिया'च्या माध्यमातून, आमचे उद्दिष्ट एक गतिमान व्यासपीठ तयार करणे आहे जेणेकरून भारतातील स्वच्छ ऊर्जा आणि बॅटरी इकोसिस्टमला गती देण्यासाठी प्रवर्तक, धोरणकर्ते आणि जागतिक नेते एकत्र येतील. २०२५ ची आवृत्ती पुढील-पिढीतील साठवण उपाय आणि शाश्वत गतिशीलतेच्या भविष्याला आकार देणाऱ्या तंत्रज्ञानावर अधिक प्रकाश टाकेल."

> **गॅमा सीएई टेक्नॉलॉजीज प्रा. लि. चे कंट्री हेड-इंडिया, श्री. रमनिक सिंग म्हणाले, "२०१८ पासून विद्युतीकरण हा एक प्रमुख केंद्रबिंदू राहिला आहे, ज्यामध्ये सुरुवातीला २०३० पर्यंत ३०% ईव्ही स्वीकारण्याचे जागतिक लक्ष्य ठेवण्यात आले होते. तथापि, सध्याचे अंदाज आता एकूण ओईएम विक्रीच्या ७% ते १५% दरम्यान आहेत, जे तंत्रज्ञान-अज्ञेयवादी पॉवरट्रेन मिश्रणाकडे झालेल्या बदलाचे संकेत देतात. भविष्यात, कार्यक्षमता, परवडणारी किंमत आणि कमी केलेली रेंज-चिंता यांसाठी डिझाइन केलेल्या इलेक्ट्रिक, हायब्रीड आणि रेंज-विस्तारित वाहनांचे मिश्रण दिसेल."**

फ्रॉस्ट अँड सुलिव्हनचे इलेक्ट्रिक व्हेइकल्स रिसर्चचे प्रमुख, श्री. प्रज्योत साठे म्हणाले, "जागतिक इलेक्ट्रिक प्रवासी कार बाजार झपाट्याने विकसित होत आहे आणि २०२५ च्या अखेरीस तो सुमारे २१ दशलक्ष युनिट्सपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे. यापैकी, सध्या बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांचा वाटा ६०–७०% आहे, तर उर्वरित ३०–३५% मध्ये प्लग-इन हायब्रीड आणि एक्सटेंडेड-रेंज इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश आहे, जे हायब्रीडच्या अलीकडील वाढीचे प्रतिबिंब दर्शवते.

या तुलनेत, भारतातील प्रवासी ईव्ही (EV) बाजार २०२४ मध्ये जवळपास ९९,००० युनिट्स पर्यंत पोहोचला आणि फ्रॉस्ट अँड सुलिव्हनच्या अंदाजानुसार २०२५ मध्ये तो अंदाजे १,४०,००० युनिट्सपर्यंत पोहोचेल. यातील ९९.९% वाहने पूर्णपणे बॅटरी इलेक्ट्रिक वाहने असतील, कारण प्लग-इन हायब्रीड अजूनही महत्त्वपूर्ण स्थान मिळवू शकलेली नाहीत.भविष्याचा विचार केल्यास, भारतीय बाजार २०३० पर्यंत सुमारे ७,००,००० युनिट्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, जी एकूण प्रवासी वाहन विक्रीच्या ७–८% व्याप्ती दर्शवते.

कॉर्डवुड टेक्नॉलॉजीज एलएलपीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अपूर्वा बेडेकर म्हणाल्या, "इलेक्ट्रिक वाहने आणि ऊर्जा साठवणूक प्रणालींमध्ये कार्यक्षम बॅटरी व्यवस्थापन प्रणालींसाठी वाढती मागणी भारतात नवनिर्मितीला चालना देत आहे. मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या ईएसएस प्रणाली अजूनही चीनमधून अंशतः तयार स्वरूपात आयात केल्या जात असल्या तरी, भारतीय परिस्थितीला अनुरूप तंत्रज्ञान स्वदेशी बनवण्याकडे जोरदार कल आहे.

या बदलासाठी स्थानिक संशोधन व विकास, प्रमाणन चौकट आणि ओईएम व तंत्रज्ञान विकासकांमधील सहकार्य वाढवणे महत्त्वाचे ठरेल. देशांतर्गत पुरवठा साखळी आणि संसाधनांचा फायदा घेऊन 'इंडिया-फर्स्ट' उत्पादने तयार केल्यास, राष्ट्राच्या बॅटरी परिसंस्थेमध्ये अधिक आत्मनिर्भरता आणि तांत्रिक परिपक्वता येण्याचा मार्ग मोकळा होईल."

## Noise कडून 'Master Buds Max'चे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य स्मार्ट लाइफस्टाईल ब्रँड Noise ने आपल्या मास्टर मालिकेचा विस्तार करत 'मास्टर बड्स मॅक्स' (Master Buds Max) हे अत्याधुनिक ओव्हर-इअर हेडफोन्स लाँच केले आहेत. भारतातील पहिले Sound by Bose तंत्रज्ञान असलेले हे हेडफोन्स उत्कृष्ट आवाज, अत्याधुनिक Active Noise Cancellation (ANC), Dynamic EQ, आणि ६० तासांची बॅटरी आयुष्य या वैशिष्ट्यांसह प्रीमियम अनुभव सर्वांसाठी उपलब्ध करून देतात.

IFA बर्लिन २०२५ मध्ये सादर झाल्यानंतर आता हे उत्पादन भारतीय बाजारात आले आहे. Noise चे सह-संस्थापक अमित खत्री म्हणाले, "Master Buds Max हा भारताच्या ऑडिओ प्रवासातील एक नवा टप्पा आहे. Sound by Bose तंत्रज्ञान, एएनसी आणि डायनॅमिक ईक्यूच्या सहाय्याने आम्ही

> **• Sound by Bose तंत्रज्ञानासह प्रीमियम ऑडिओ अनुभव**

जागतिक दर्जाचा अनुभव भारतीय ग्राहकांसाठी आणत आहोत."

एर्गोनॉमिक डिझाईन, व्हेगन लेदर कुशन्स आणि क्विक चार्जिंगमुळे हा हेडफोन दिवसभर वापरण्यास आरामदायी आणि टिकाऊ ठरतो. कॉल दरम्यान ENC तंत्रज्ञानामुळे पार्श्वभूमीचा आवाज पूर्णपणे कमी होतो, तर ड्युअल डिव्हाइस पेअरिंगमुळे वापर सुलभ होतो.


मास्टर बड्स मॅक्स हे तीन प्रीमियम रंगांमध्ये १४ ऑक्टोबर २०२५ पासून Gonoise.com, Amazon, Reliance Digital, Croma आणि Vijay Sales वर ₹९९९९ या प्रारंभिक किमतीत उपलब्ध असतील.

## जीई ऐरोस्पेसच्या पुण्यातील उत्पादन सुविधेचे १० वर्षे पूर्ण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आज जीई ऐरोस्पेसच्या पुण्यातील उत्पादन सुविधेने कार्यसंचालनांची दहा वर्षे साजरी केली, जो भारतातील विमान वाहतूक उद्योगामधील कंपनीच्या चार दशकांच्या इतिहासामधील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला. गेल्या दशकभरात पुणे व्यावसायिक जेट इंजिन कम्पोनण्ट्सच्या उत्पादनासाठी हब आणि प्रगत उत्पादन कौशल्य विकासासाठी केंद्र म्हणून उदयास आले आहे, जेथे त्यांच्या अॅप्रेन्टिस आणि इतर उपक्रमांच्या माध्यमातून 5,000 हून अधिक उत्पादन सहयोगींना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

"आम्ही पुण्यामध्ये आमची फॅक्टरी सुरू केली तेव्हा आमच्याकडे ऐरो -इंजिन परिसंस्था नव्हती. दहा वर्षांनंतर आम्ही जागतिक दर्जाचा उत्पादन कौशल्य आधार निर्माण करण्यासोबत मोठ्या ऐरोस्पेस क्षेत्राप्रती योगदान देखील दिले आहे. आम्ही महाराष्ट्रामध्ये



उच्च-स्तरीय उत्पादन व कौशल्यासाठी विकसित केलेल्या स्थानिक क्षमतेचा मला अभिमान वाटतो, असे जीई ऐरोस्पेसच्या ग्लोबल मॅन्युफॅक्चुरिंग ऑपरेशन्स अँड सप्लाय चेनचे कार्यकारी संचालक अमोल नागर म्हणाले.

पुण्यातील उत्पादन सुविधा सीएफएमच्या लीप (LEAP), जीईएनएक्स आणि जीई9एक्स इंजिन्ससाठी कम्पोनण्ट्स उत्पादित करते, जे जगभरातील कारखान्यांमध्ये ग्राहकांच्या वाढत्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी वापरले जातात. या सुविधेच्या यशाला जीई ऐरोस्पेसचे प्रोप्रायटरी लीन ऑपरेटिंग मॉडेल फ्लाइट डेकचे पाठबळ आहे, जे सुरक्षितता, दर्जा व कार्यक्षमतेला प्राधान्य देते. फ्लाइट डेक तैनात करत आणि शॉप फ्लोअरवरील कर्मचाऱ्यांच्या 1,000 हून अधिक शिफारशींचा फायदा घेत या सुविधेने अपव्यय कमी केला आहे, प्रक्रिया कार्यक्षमता वाढवली आहे आणि आऊटपूट वाढवले आहे, तसेच शॉप-फ्लोअरवरील सुरक्षितता सुधारली आहे. महत्त्वपूर्ण कम्पोनण्टसाठी नवीन मॉडेल लाइनसह या सुविधेने कमी लीड टाइम शक्य केला आहे, त्याच टीमसोबत उत्पादकता वाढवली आहे आणि डाऊनटाइम कमी केला आहे. ती लाइन आता सहा तिमाहींपेक्षा अधिक कालावधीदरम्यान करण्यात आलेल्या अनेक सुधारणांच्या मदतीने दुप्पटीहून अधिक पार्ट्सची निर्मिती करते.

"पुण्यातील कम्पोनण्ट्स आमच्या जागतिक कारखान्यांमध्ये वापरले जातात, जेथे ते सीएफएमचे लीप, जीईएनएक्स आणि जीई9एक्स इंजिन्स डिझाइन करण्यासाठी वापरले जातात. आम्हाला सुरक्षितता आणि दर्जावर लक्ष केंद्रित करण्यासह आमच्या फ्लाइट डेक प्रोप्रायटरी लीन ऑपरेशन्स मॉडेलचा वापर करून जगभरातील ग्राहकांना सेवा देण्यास आणि त्यांच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्याचा आनंद होत आहे, असे जीई ऐरोस्पेसच्या पुण्यातील उत्पादन सुविधेचे व्यवस्थापकीय संचालक विश्वजीत सिंग म्हणाले.

# शब्दसुरांच्या साथीने तीन भारतरत्नांना सांगीतिक अभिवादन

## मराठवाड्यातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी निधी संकलन; रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजतर्फे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या बुलंद स्वरांच्या आठवणी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या मधुर स्वरांच्या स्मृती आणि ज्येष्ठ राजनीतिज्ञ, कवी अटल बिहारी वाजपेयींची समर्थ शब्दकळा, यांचा त्रिवेणी संगम रसिकांनी शनिवारी सायंकाळी अनुभवला. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या फर्ग्युसन रोडवरील संकुलातील मोडक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



निमित्त होते, मराठवाड्यातील पूरग्रस्त भागातील मुलामुलींसाठी सहाय्यता निधी उभारण्यासाठी आयोजिलेल्या 'तीन भारतरत्न', या सांगीतिक मैफलीचे! भारतरत्न पंडित भीमसेन जोशी, गानसम्राज्ञी लता मंगेशकर व कवी अटलबिहारी वाजपेयी यांच्या गाणी, कविता आणि आठवणी असा गोफ या मैफलीच्या माध्यमातून रसिकांनी अनुभवला. गायिका मनीषा निश्चल, गायक अमोल निसळ व संजीव मेहेंदळे यांच्या बहारदार सादरीकरणाने ही मैफल दीर्घकाळ स्मरणात राहील, अशी झाली. मनीष आपटे यांच्या ओघवत्या निवेदनाने मैफलीचा आनंद द्विगुणित झाला.

गायिका मनीषा निश्चल यांनी ज्योतिकलश झलके, अपनेही मन से कुछ मांगे, राम का गुणगान करिये, मेंदीच्या पानावर, दिल हुम हुम करे... ही गीते सादर केली. संजीव मेहेंदळे यांनी आरंभी वंदिन अयोध्येचा राजा, भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, राम का गुनगान करिये, भेटीलागी जीवा... या रचना ऐकवल्या, तर अमोल निसळ यांनी आता कोठे धावे मन, तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल, राजस सुकुमार मदनाचा पुतळा.. यांचे सादरीकरण केले. बाजे रे मुरलिया बाजे या रचनेने या रंगतदार मैफलीची सांगता झाली.

पं. भीमसेन जोशी यांच्या संतवाणीतील काही निवडक रचना, प्रखर राजनीतिज्ञ तथा कवी अटल बिहारी वाजपेयी यांच्या काही कविता आणि गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांची काही अभिजात गीते, असा मेळ या कार्यक्रमाच्या निमित्ताने जुळून आला. विवेक परांजपे (सिंथेसायजर आणि संगीत संयोजन), यश भंडारे (की बोर्ड), अमेय ठाकूरदेसाई (तबला), अनिल करंजवकर (पखवाज), चेतन परब (आक्टोपड) यांनी पूरक साथसंगत केली.

रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गेट सेट गो हॉलिडेज प्रस्तुत, मनीषा निश्चल्स महक निर्मित 'तीन भारतरत्न' या कार्यक्रमाला सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापकअध्यक्ष डॉ. संजय बी. चोरडिया, दिव्यांग इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे (डिकाई) रघुनाथ येमुल गुरुजी, विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, 'रोटरी'चे अध्यक्ष जीवराज चोले, सचिव तेजस्विनी थिटे उपस्थित होते.

रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजचे अध्यक्ष जीवराज चोले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मी स्वतः समितीचा माजी विद्यार्थी आहे. विद्यार्थी समितीला कधीच विसरत नाहीत. त्यामुळे मराठवाड्यातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात पुढे करणे, हे कर्तव्य समजून, या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजच्या वतीने विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी एक लाख ५१ हजारांचा निधी समितीला देत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, समितीच्या कार्याला मी अभिवादन करतो. अशा कार्यात सहभागी होणे हे नैतिक व मूल्याधिष्ठित कार्य आहे, असे आम्ही समजतो. त्यामुळे जिथे कमी आहे, तिथे सूर्यदत्त आहे, असे आश्वासन मी देतो.

## एक्सेल आणि टायगर ग्लोबल बॅक्ड इन्फ्रा.मार्केट, गोपनीय मार्गाने डीआरएचपी दाखल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूत्रांनुसार भारतातील सर्वात जलदगतीने विकसित होणाऱ्या बांधकाम साहित्य व्यासपिठांपैकी एक असलेल्या एक्सेल आणि टायगर ग्लोबल बॅक्ड इन्फ्रा.मार्केटने, त्यांचे ड्राफ़्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) गोपनीय पद्धतीने सिक्युरीटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्डाकडे (सेबी) दाखल केले असल्याची माहिती समोर आली आहे. याबद्दल माहिती असलेल्या लोकांचा मते, कंपनीचा मानस हा नवीन शेअर्स जारी करून, विद्यमान भागधारांकडून विक्रीसाठी ऑफ़र देऊन (ओएफएस) सुमारे ४,५०० ते ५,००० कोटींची रक्कम उभारण्याचा आहे. याबद्दलची नोंद ही सेबीचा (इश्यु ऑफ़ कॅपिटल अॅन्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट) नियामक , २०१८मधील गोपनीय किंवा प्री-फ़ायलिंग मार्गाने केली गेली आहे. या तंत्रज्ञानानुसार डीआरएचपी सार्वजनिक करण्यापुर्वी कंपनीला शेअरचे ड्राफ़्ट ऑफ़र दस्तावेज, नियामकाकडे जमा करता येतात. सूत्रांनुसार, कंपनीने कोटक इन्वेसमेंट बँकिंग, एचएसबीसी आणि गोल्डम सॅक्चला आपले मर्चंट बँकर म्हणून निवडले आहे. कंपनी किंवा त्यांचा प्रवक्त्यांनी आयपीओचा वेळेबद्दल काहीही सांगण्याचे नाकारले. विविध माध्यमांनुसार, सध्या, इन्फ़्रा. मार्केटने सिरीज जी राऊंड फ़ंडिंगमध्ये रू.७३० कोटी उभारले , यामुळे २४,६०० कोटी रूपयांचा (२.८ अब्ज डॉलर्स) प्रस्तावित आयपीओ पुर्वीच त्यांची बॅलन्सशीट मजबूत झाली. २०१६ मध्ये सौविक सेनगुप्ता आणि आदित्य शारदा यांनी निर्माण केलेले, इन्फ़्रा.मार्केट हे भारतातील सर्वात-जलद गतीने विकसित होणारे बांधकाम साहित्य व्यासपिठ बनले असून, त्यांचाद्वारे बांधकाम क्षेत्रातील संपूर्ण उपाययोजना प्रदान केल्या जातात.

> **२५०+ उत्पादन युनिट्सचा मजबूत नेटवर्क्ससह आणि आरडीसी कॉंक्रीट, शालीमार पेंट्स, एम्सर मिलेनियम टाईल्स आणि ॲम्स्ट्रॅड सारख्या कंपन्यांमध्ये धोरणात्मक गुंतवणूक करून, कंपनी संपूर्ण भारतात १०,००० + रिटेल टचपॉंट्सचा माध्यमाने कार्यरत आहे. इन्फ़्रा.मार्केट हे असे एकमेव व्यासपिठ आहे जिथे १५+ उत्पादन श्रेणी उपलब्ध आहेत, ज्यात कॉन्क्रीट, वॉलिंग सोल्युशन्स, स्टील, ॲग्रीगेट्स, पाईप्स अॅन्ड फ़िटिंग्ज, एमडीएफ़, प्लायवुड, लॅमिनेट्स, टाईल्स, पेन्ट्स, मोड्युलर किचन, डिझायनर हार्डवेअर, इलेक्ट्रिकल्स, अपलायन्स आणि कन्सुमर ड्युरेबल्स चा समावेश होतो यामुळे बांधकामाचा प्रत्येक स्तरावर विश्वसनीयता, मापन आणि गुणवत्तेची हमी मिळाते.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

दैनिक जनप्रवास



# मा. श्री. गोविंद घोळवे

'दैनिक जनप्रवास' च्या

राजकीय संपादक पदी गोविंद घोळवे यांची नियुक्ती

## अभिनंदन

शुभेच्छुक



**मा. श्री. विश्वासराव आरोटे**

मुख्य संपादक : दै. स. गांवकरी

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष : विशेष समाजकल्याण परिषद

सरचिटणीस : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

पुणे प्रहार पुर्ननिर्मितीतुन प्रगतीकडे...! www.puneprahar.com



**मा. श्री. प्रतिक गंगणे**

संपादक : पुणे प्रहार

पुणे निवासी संपादक : दै. गांवकरी

व्यवस्थापकीय संपादक : दै. आरंभ पर्व